# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी : २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२

तार : EDUTECH E-mail : desk 4@dte.org.in web : http://www.dte.org.in


परिपत्रक

का.क्र.४/आस्था/परिपत्रक/२०१०/ २१५

दि. 23 SEP 2010

संदर्भ – परिपत्रक क्र.४/आस्था/२००८/२५२८,दि.१४/१०/२००८.

संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालये व संस्थामधील काही सहसंचालक व संस्था प्रमुख हे पूर्वपरवानगी न घेता दौरा/रजेवर जातात व मुख्यालय सोडतात ही बाब प्रशासनाच्या व कार्यालयीन शिस्तीच्या दृष्टीने उचित नाही. याबाबत संदर्भिय परिपत्रकान्वये तसेच त्या अगोदरही कळवून देखील त्याची दखल घेतली जात नाही,ही बाब योग्य नाही. तरी सर्व सहसंचालक व संस्थाप्रमखांना पुन्हा सूचित करण्यात येते की, सहसंचालकांनी संचालकांच्या पूर्वपरवानगी शिवाय तसेच संस्थाप्रमखांनी संबंधीत सहसंचालकांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडू नये. तसेच सहसंचालकांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबत संचालकांना व संस्थाप्रमुखांनी संबधीत सहसंचालकांना फॅक्सद्वारे कळवून त्याची प्रत संचालकांना पाठवावी.

तसेच सहसंचालक/ संस्थाप्रमुख यांनी त्यांचे मुख्यालय सोडण्यापूर्वी संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणे दौरा,रजा इत्यादी बाबतचा तपशील वेळोवेळी या संचालनालयास सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

आस्था-१

( डॉ.सु.का. महाजन )
प्र.संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत – माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१) सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई/पुणे /नाशिक /औरंगाबाद/अमरावती /नागपूर.
२) सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था. (विभागीय कार्यालयांन मार्फत)
३) कार्यासन अधिकारी. का.क्र.४-अ.१२.

---

*जा.क्रं.विकापु/आस्था /संकिर्ण/२०१०/ ६३११* *तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे*

*दिनांक* 14 OCT 2010

*प्रतिलिपी सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये / तंत्रनिकेतने व तत्सम संस्था*

*त्यांना यांना कळविण्यात येते की, वर पत्रामध्ये संचालक तंत्रशिक्षण मुंबई यांनी नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.*

*(डी.एन.शिंगाडे)*
*प्र.सहसंचालक,*
*तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे*